# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/12/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. उमरेड** :— फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष हिचे प्रेम प्रकरण **आरोपी नामे— गणेश वैदय रा. पवनी जि. भंडारा** याचे सोबत सुरू असल्याने ते एकमेकांना चांगले ओळखत होते. फिर्यादी ही मागासवर्गीय शासकीय मुलींचे वस्तीगृह येथे राहून शिक्षण घेत असुन दिनांक १६/१०/२०२३ रोजी ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी ही कॉलेजला जाण्याचे कारण सांगून वस्तीगृहातून निघून बसमध्ये बसून उमरेड येथे बसस्टॉपवर आली बसस्टॉप वरून स्नॅपचॅट वरून मित्र गणेश वैदय याला मॅसेज करून मी तुला भेटायला उमरेडला आली आहे, मला भेटायला तु बसस्टॉपवर ये असा मॅसेज केल्याने आरोपी हा उमरेड बसस्टॉपवर आला व दोघेही आरोपी राहत असलेले उमरेड येथील किरायाचे रूमवर आले, तेथे त्यांचे प्रेमसंबंध असल्याने दोघांमध्ये दुपारी १२/०० वा. दरम्यान शारीरीक संबंध झाले त्यानंतर आरोपीने फिर्यादीला उमरेड बस स्टॉपवर सोडून दिले व फिर्यादी परत उमरेड वरून ०५/०० वा. वस्तीगृहात गेली व कोणालाही काही सांगितले नाही. फिर्यादी ही शासकीय मुलींचे बालगृह येथे राहत असल्याने फिर्यादीला पाळी न आल्याने दिनांक ०४/१२/२०२३ रोजी प्रेगनेंन्सी कीटद्वारे डॉक्टरांनी तपासणी केली असता फिर्यादी ही गरोदर असल्याचे समजले. फिर्यादीचे बयाणावरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ भादवी ४, ६ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुचिता मंडवाले मॅडम मो. क्र. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

## पार्सल (बॅग) चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील नागपुर अमरावती रोडवर एच पी पेट्रोलपंपाजवळ कोंढाळी येथे दिनांक १२/१२/२०२३ चे ०३.०० वा. ते ०४.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रशांत मुकुदरा शिरपुरकर, वय ३३ वर्ष रा. माळगी नगर हुडकेश्वर रोड नागपुर शहर हा रोनाल कापसे रा. नागपुर याचे कंटेनर क्र. एम एच— ४९/ ए.टी. —८२५२ वर चालक म्हणुन काम करतो व शेखावत लॉजीस्टिक या कंपनीचा मुद्देमाल घेवुन जात असतो. यातील चालक हा त्याच्या कंटेनर मध्ये एकुण ६९ पार्सल घेवून नागपुर वरुन जालना, पुणे येथे कंटेनर घेवुन जात असता कोंढाळी येथे झोप आली असता त्याने त्याची कंटेनर गाडी रोडच्या बाजुने उभी केली व कंटेनर मध्ये झोपला पहाटे ०५/४५ वा. दरम्यान झोपेतुन उठला असता त्याला त्याच्या कंटेनरचा दरवाजा उघडा दिसला व कंटेनर मधील १८ पार्सल अंदाजे किंमती ५०,०००/—रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार तांदुळकर हे करीत आहे.

## बॅटरी चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत भिवापुरकर राईस मिल भिवापुर जि. नागपुर येथे दिनांक १२/१२/२०२३ चे ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— वैभव वनवास सोरदे, वय ३३ वर्ष, रा. तास कॉलोनी ता. भिवापूर जि. नागपूर यांचे ट्रॅक्टर मध्ये असलेला चालक नामे— विशाल भुरे रा. निलज यांनी फिर्यादीस फोन करून सांगीतले की तो ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/ एल— ४७६० व ट्रॅक्टर क्र. एम. एच—४०/ सीए— ०८२२ हे दोन्ही शेतामध्ये घेवुन जाण्यासाठी गेला असता दोन्ही ट्रॅक्टरची एक बॅटरी एसएफ कंपनीची किंमती ५०००/— रू व दुसरी कंपनी माहीत नाही किंमती ४०००/— रू तसेच एम.एच.—१०/बी.ई— २४५५ मधील एक्साईड कंपनीची बॅटरी किंमती ४०००/— रू. असे एकुण १३०००/— रू. ची बॅटरी कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण जाधव पोस्टे भिवापुर मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर मौजा जलालखेडा येथे दिनांक १२/१२/२०२३ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— ईरशान मोहम्मद खा पठान वय ३२ वर्ष रा. आमनेर ता. वरूड जि. अमरावती हा त्याचे काका नामे साहेब खा युसुफ खा पठान यांचे सोबत स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा जलालखेडा येथे आला व फिर्यादीचे काकाने बॅकेतुन ४९,०००/— रूपये काढले व फिर्यादीला मोजायला दिले असता फिर्यादी पैसे मोजत असता एक अनोळखी ईसम तेथे आला व फिर्यादीस म्हणाला की ''हे पैसे नकली आहे'' असे म्हणुन फिर्यादीची दिशाभुल करून फिर्यादीचे हातातील १६,५००/— रूपये घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४१७, ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय रिधोरकर, पोस्टे जलालखेडा मो. नं. ८००७६७१९८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**